**प्रेस नोट**

स्थानिक गुन्हे शाखा जळगांव
दिनांक 27/04/2025

मा. संपादक

----------------------------------

**गावठी कट्टा बाळगणारा स्थानिक गुन्हे शाखा जळगाव कडून अटक.**

--- ००० ---

मा.डॉ.श्री महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक सो, यांनी स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव येथील पथकास जळगाव शहरात काही इसम हे दहशत माजविण्याचे उद्देशाने अवैध अग्नी शस्त्र वापरत आहेत. सदर बाबत गोपनीय माहिती काढून अश्यां लोकांवर योग्य ती कारवाई करा असे आदेश दिले.

मा.श्री.बबन आव्हाड सो वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव यांनी पोउपनिरी श्री शरद बागल, सफौ/अतुल वंजारी, सफौ/राजेश मेढे, पोहेकॉ/हरीलाल पाटील, पोहेकॉ/विजय पाटील,पोहेकॉ/अक्रम शेख सर्व नेम.स्थागुशा जळगाव अशांचे पथक तयार करण्यात आले होते.

काल दिनांक 26/04/2025 रोजी मा. श्री.बबन आव्हाड सो. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव यांना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, मुदस्सीर नझर सलीम परवेझ शेख रा. ताबापुरा ता.जि.जळगाव हा जळगांव कडुन चाळीसगांव कडे त्याच्याकडील यामाहा कंपनिची मो.सा. क्रं. एमएच ४७ बियु ०३७७ ने गैरकायदा गावठी बनावटीचे पिस्टल त्याचे कब्जात बाळगुन विक्री करण्यासाठी जात आहे. तुम्ही त्यास तात्काळ ताब्यात घेवुन कारवाई करा असे सांगीतल्याने वरनमुद पथक शिरसोली रोडवरील हॉटेल आमंत्रणच्या अलीकडे जळगांव जकातनाका येथे दबा धरुन बसले होते. त्यावेळी जळगांव कडुन एक इसम हा काळ्या रंगाची यामाहा कंपनीची मोपोड मोटार सायकलने येताना दिसला त्यास थांबबुन रोडचे बाजुला सदर वाहनाचा क्रं. एमएच ४७ बियु ०३७७ पाहून खात्री करून मो.सा. चालक यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव मुदस्सीर नझर सलीम परवेझ शेख रा. ताबापुरा ता.जि.जळगाव असे सांगीतले त्यावरून त्याचे अंगझडती घेता त्याचे ताब्यात एक काळ्या रंगाच्या लोखंडी धातूचा, काळया रंगाची प्लास्टीक मुठ असलेला गावठी कट्टा (विवक्षीत हत्यार ) मॅग्झीनसह, ०५ जिवंत काडतूस पिवळसर रंगाचे धातुचे, काळ्या रंगाची मॅगझीन, एक यामाहा कंपनिची काळा रंगाची अरॉक्स मॉडेलची मो.का क्रं. एमएच ४७ बियु ०३७७ असा एकुण २,१५,०००=०० रुपये मुद्देमाल मिळून आल्याने त्यास ताब्यात घेवून त्याचे विरुध्द एम.आय.डी.सी. पो.स्टे.CCTNS NO ३००/२०२५ शस्त्र अधिनियम ३/२५ (१ ब-) ५(१)A,२५(१) (A) वगैरे प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याची वैद्यकिय तपासणी करून त्यास सदर गुन्ह्याचे पुढील तपासकामी एम.आय.डी.सी. पो.स्टे.चे ताब्यात देण्यात आले आहे. यातील आरोपी म।। याचे वर यापुर्वी शत्र अधिनियम अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर आरोपीस एक दिवस पोलीस कस्टडी मिळाली असुन त्याचे साथीदार याचा शोध सुरु असुन पुढील तपास पो.उपनिरी. सचिन नवले करीत आहेत.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधिक्षक श्री.माहेश्र्वर रेड्डी सो , मा. अपर पोलीस अधिक्षक श्री अशोक नखाते सो, मा.उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.संदीप गावीत सो, याच्या मार्गदर्शनाखाली स्थनिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरी.श्री. बबन अव्हाड सो, पो.उपनिरी शरद बागल, सफौ/राजेश मेढे, अतुल वंजारी, ,पोहेकॉ/हरीलाल पाटील, विजय पाटील,अक्रम शेख अशानी केली आहे.

**( बबन आव्हाड )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव.

